**गृहिणींच्या घरकामाचं आर्थिक मूल्यांकन - काळाची गरज?**

'दिनूचं बिल' ही आचार्य अत्रेंची कथा आपण लहानपणी वाचली असेल, एखादं छोटंसं काम सांगितल्यावर त्याचा कंटाळा करणाऱ्या, आईला उलट बोलणाऱ्या दिनूला, आईनं केलेल्या कामांची आणि त्यासाठी तिला मिळणाऱ्या मोबदल्याची यादी मिळते. आईला घरातल्या सगळ्या कामांचा मोबदला – 'शून्य रुपये' मिळतो, हे वाचून त्याचे डोळे उघडतात. अत्र्यांनी ही गोष्ट ज्या काळात आणि परिप्रेक्ष्यात लिहिली, जो वाचकवर्ग समोर ठेवून लिहिली ते पाहता गोष्ट योग्य आणि महत्वाचा बोध देणारीच आहे, पण आजच्या काळातल्या प्रत्येक दिनूच्या आईला, आई नसलेल्या बायकांनाही त्यांच्या घरातील कामाचा मोबदला मिळायला हवा. कारण आईचं बिल वाचून डोळे उघडणारे दिनू आज आजूबाजूला नाहीत, 'आई कुठे काय करते?' घरीच तर असते, अस म्हणत सदैव तिचा अपमान करणाऱ्या बबड्यांची चलती असणाऱ्या काळात गोष्टी बदलायला हव्यात. आता गृहिणींनीही

त्यांच्या कामाच्या दरपत्रकाचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

सध्या समाजमाध्यमांवर ‘द ग्रेट इंडियन किचन’ या मल्याळी सिनेमाची जोरदार चर्चा सुरू आहे. सिनेमातली नायिका आणि भारतातल्या बहुसंख्य गृहिणी सतत काहीतरी चिरत, कुटत, निवडत, निथळत, कापत, शिजवत, उकडत, भाजत, शेकवत असतात. स त त स्वयंपाकघरात अथवा घरात राबत असतात.

‘इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन’नं २०१८ पासून २०२१पर्यंत केलेल्या संशोधनानुसार जगभरातील महिला दिवसातून सरासरी ४ तास २५ मिनिटं इतका वेळ मोबदलाविहीन श्रम करतात. यात घरातील कामाचा, लहान मुलं- वृद्ध यांची काळजी घेणे इ. बाबींचा समावेश होतो. तेच पुरुषांबाबत बघायचं झालं तर जगभरातील पुरुष दिवसाला सरासरी १ तास २३ मिनिटं मोबदलाविहीन श्रम अर्थात घरातली कामं करतात. एकाच प्रकारचे श्रम करण्याच्या पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या कालावधीतली तफावत घरकाम, मोबदलाविहीन श्रमांच्या बाबतीत किती मोठ्या प्रमाणात लिंगभेद आहे, हे दाखवण्यासाठी पुरेशी आहे.

घरात काम करणारी बाई मग ती सधवा असो की विधवा, घटस्फोटित असो की अशिक्षित किंवा अपंग वा अजून काही. ती दिवसभर घरात करत असलेल्या कामांमध्ये तिचे श्रम, ऊर्जा आणि आयुष्यातला मौल्यवान वेळही खर्च होतो, तरी त्याची दखल घेतली जात नाही. त्या कामाला प्रतिष्ठा नाही, मुळात त्याला कामाचा दर्जाच दिला जात नाही. शिवाय या कामांमध्येच गुंतून पडल्याने तिच्यातील सर्जनशीलताही मारली जाते.

घरातल्या कामांच्या रेट्यामुळे, गृहिणीनं शिक्षण घेणं अथवा आवडीच्या गोष्टी करणं, छंद जोपासणं यासाठी वावच राहत नाही. अर्थात घरातलं काम सांभाळून स्त्रियांना अर्धवेळ नोकरी किंवा एखादा कोर्स करण्याची 'परवानगी देणारे' उदार लोकही आहेत. पण पितृसत्ताक समाजाची मुख्य अपेक्षा हीच, बाईने घरातलं काम चोख आणि वेळेवर केलं पाहिजे.

भरपूर शिक्षण घेतलेल्या पण नंतर पूर्णवेळ संसारात रमून, तिन्ही त्रिकाळ स्वयंपाकघरात खपणाऱ्या काही स्त्रियांचं 'इतकी मॉडर्न सून आहे, पण संस्कार चांगले हो...लग्नानंतर घराबाहेर पाऊल टाकलं नाही, सगळं घर कसं आरशासारखं

लख्ख ठेवते’ असं म्हणत कौतुक केलं जातं. घर आरशासारखं ठेवणाऱ्या सुनेकडे घराची मालकी मात्र नसते. मुलाप्रमाणेच सुनेच्याही नावावर घर करण्याचा विषय निघाला की, लगेच कालपर्यंत घराची नायिका असलेल्या सुनेला खलनायिकेचा खिताब बहाल केला जातो.

खरं तर गृहिणींच्या जीवावर घरातील इतर सदस्य विशेषतः पुरुष नोकरी, व्यवसाय, करिअर, शिक्षण सगळं करतात. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाला हातभार लावतात, पण हे शक्य होतं ते गृहिणी घरातली जबाबदारी उचलतात, त्यामुळेच. म्हणूनच ‘गृहिणींचे घरातील श्रम सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपीला) हातभार लावतात, त्यामुळे जीडीपी मोजताना त्यात स्त्रियांच्या या घरकामाचा समावेश करावा, अशी स्त्रीवादी गटांची मागणी हल्ली जोर धरू लागली आहे. मात्र भांडवली व्यवस्थेत, हे श्रम जीडीपीमध्ये कसे मोजावेत, यावर कोणतंही उत्तर नाही.

या श्रमांचं मूल्यांकन नेमकं कसं करावं, याबाबतही चर्चा होण्याची गरज आहे. अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ज्ञ, स्त्रीवादी गटांनी मिळून यावर काम केल्यास याचं काही उत्तर मिळू शकेल.

सर्वोच्च न्यायालयानं गृहिणीच्या श्रमांची दखल घेणारा जानेवारी २०२१ मध्ये दिलेला एक निर्णय या दृष्टीनं फार महत्वाचा आहे. रस्त्यावरील अपघातात एका दाम्पत्याचा मृत्यू झाल्यावर, ज्यांच्याकडून तो अपघात झाला, त्या आरोपींनी मृतांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भातला हा निर्णय होता. यातील मृत दाम्पत्यातील स्त्री गृहिणी होती. त्यामुळे ती कमावती नसल्याने, तिच्या वतीनं नुकसानभरपाई देण्याची गरज नाही, असा आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद होता. त्यावर 'मृत पुरुषाच्या नोकरीनुसार, वारसाला जेवढी नुकसानभरपाई दिली जाणार आहे, तेवढीच रक्कम पत्नीच्या नावानेही वारसाला दिली पाहिजे, पत्नी गृहिणी असली तरी तिच्या कामाचं मूल्यांकन पतीच्या कामाच्या मूल्यमापनाप्रमाणेच असेल.' असं सर्वोच्च न्यायालयाने या निकालात म्हंटलं आहे. हा एक महत्वाचा निकाल असला तरी हे चित्र केवळ अपघात वा अपवादात्मक परिस्थितीत न दिसता सर्वत्र दिसण्याची गरज आहे.

गृहिणींच्या घरकामाचं मूल्यांकन कसं आणि कोण करणार? हा एक महत्वाचा प्रश्न. तर याचं उत्तर शोधताना अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ज्ञ, स्त्रीवादी गट, संशोधक यांच्याप्रमाणेच

मुख्य भागधारक गृहिणींनाही सामावून घेतलं पाहिजे. त्यांना याबद्दल काय वाटतं? त्यांच्या दृष्टीनं किती मोबदला योग्य आहे, या मोबदल्यात त्यांच्या सामाजिक सुरक्षांचा अंतर्भाव आहे का? तसंच हा मोबदला नेमकं कोण आणि कसा देणार? घरातली दुसरी कमावती व्यक्ती की सरकार इ. प्रश्नांची सांगोपांग चर्चा होणं गरजेचं आहे.

केरळमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये तर तिथल्या कम्युनिस्ट पक्षानं, राज्यातील स्त्रियांना घरकाम भत्ता देण्याचं आपल्या जाहीरनाम्यात म्हंटलं आहे. असं खरं तर सर्वच पक्षांना त्या त्या राज्यातील स्थानिक पातळीवर अथवा केंद्रीय सत्तेतील सत्ताधारी पक्षाला करता येणं शक्य आहे, मात्र त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची, आणि लिंगभाव समता माननणाऱ्या धोरणकर्त्यांची गरज आहे.

गृहिणींच्या श्रमाचं आर्थिक मूल्यांकन करून, त्यांना त्याप्रकारे मोबदला देणं तर गरजेचं आहेच पण हे करताना त्याचा ‘जेंडर रोल्स’वर काय परिणाम होईल, हेही तपासलं पाहिजे आणि त्याचाही विचार केला पाहिजे. गृहिणी असल्यावर त्याचा मोबदला मिळतोय म्हणून अधिकाधिक स्त्रिया घरीच राहणं पसंत करतील आणि पुरुष उंबरठ्याबाहेर जाऊन काम

करेल, असं तर होणार नाही ना? हे पाहिलं पाहिजे. तसं झालं तर तो एक लोभस सापळा ठरेल, स्त्रियांना उंबरठ्याआतच अडकवून ठेवण्याचा. श्रमाचा मोबदला तिला मिळेल, ही चांगलीच गोष्ट असली तरी स्त्रीला उंबरठ्याबाहेर पडता यावं, यासाठी स्त्रीवादी चळवळीनं जो संघर्ष केला, तो दोन पावलं मागे येईल. म्हणूनच केवळ गृहिणींना घरकामाचा मोबदला देण्याच्या विचारापेक्षा घरकाम करणाऱ्या 'व्यक्तीला' मग ती स्त्री असो की पुरुष अथवा इतर जेंडरची व्यक्ती – त्या व्यक्तीला घरकाम करण्याचा मोबदला देता येईल. जेणेकरून स्त्रियाच पुन्हा गृहिणीच्या भूमिकेत अडकणार नाहीत आणि पुरुषांनाही एक प्रकारे गृहिणी बनण्यासाठी, घरातली कामं करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. व्यक्ती कोणीही असली तरी तिला घरातली कामं करण्याचा मोबदला मिळणार असल्याने अमुक कामं स्त्रियांची आणि अमुक कामं पुरुषांची अशा चौकटी बळकट होणार नाहीत, कोणालाही कोणत्याही कामाचा आनंद घेता येईल.

याचा आणखी एक फायदा म्हणजे 'बाहेरुन कमवून आणाच' असं पितृसत्ताक व्यवस्थेनं, मर्दानगीच्या कल्पनांनी पुरुषांवर लादलेलं जोखड फेकून द्यायला पुरुषांनाही अल्पशी

मदत होईल. कुटूंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचा पुरुषांवरही एक अदृश्य पण प्रचंड दबाव असतो, कदाचित हा ताण हलका होईल. 'हाऊस हजबंड्स'ची संख्या वाढेल. दुसरा फायदा म्हणजे लहान बाळांची काळजी घेणं, वृद्धांची जबाबदारी, त्यांना केला जाणारा मायेचा स्पर्श इ. बाबी पुरुषांनी घरात राहून केल्या तर त्यांचं मानसिक स्वास्थ्य चांगलं राहतं, असं मानसशास्त्रज्ञ म्हणतात, यावर अनेक संशोधनं झाली आहेत, निबंध लिहिले गेले आहेत. शिवाय ज्या पुरुषांना घरातली कामं करायला तर आवडतं पण मग घरीच बसून राहिल्याने, आपण काहीच कमवत नाही, असा न्यूनगंड येतो, तर तेही टळेल.

गृहिणींच्या घरकामाचं मूल्यांकन करताना आणि त्यानंतर तिला तो मोबदला देताना अर्थसाक्षर करणंही तितकंच महत्वाचं आहे. मुख्य म्हणजे हा मोबदला दरमहा काही वेतन वा वार्षिक काही रक्कम अशा कोणत्याही स्वरुपात असला तरी त्या पैशावरचा संपूर्ण अधिकार त्या गृहिणीचाच असला पाहिजे. तो पैसाही घरातला पुरुषच हिरावून घेणार असेल, तर त्याला अर्थ नाही. आपल्याकडे तर कमावत्या बायकोचा संपूर्ण पगार स्वत:च्या खात्यात घेणारे आणि वर तिलाच प्रवासखर्चाचे पैसे 'देऊ करणारे' पुरुष भरपूर आहेत. बाहेर नोकरी करणाऱ्या

आणि घरातही खपणाऱ्या महिला, मजुरी करणाऱ्या, शेतात राबणाऱ्या विशेषत: असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी दुहेरी जबाबदारी पार पाडूनही बऱ्याच महिलांना आयुष्यात एकदाही मनाप्रमाणे हॉटेलिंग करता येत नाही वा एखादी साडीही विकत घेता येत नाही. त्यामुळे तिच्या पैशावरची तिची स्वायत्तताही तितकीच महत्वाची आहे आणि त्यासाठी तिला बँकेचे व्यवहार, बचत, गुंतवणूक इ. मूलभूत बांबींचं प्रशिक्षण देणंही गरजेचं आहे.

गृहिणींच्या घरकामाचं आर्थिक मूल्यांकन करताना त्यात एकल स्त्रियांचा अधिक सहानुभूतीने विचार करायला हवा. विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता तसंच अपंग महिला यांना इतर गृहिणींपेक्षा थोडा अधिक मोबदला देणं आवश्यक आहे. अशा महिलांना घरकामात कुणाची मदत मिळत नाही, तसंच त्यांच्यापुढील आव्हानं अधिक असतात, कुटूंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडायलाही इतर कुणाची मदत नसते. सध्या विधवा स्त्रियांना संजय गांधी निराधार योजनेमार्फत पेन्शन दिली जाते, तसंच वृद्ध स्त्रियांना श्रावणबाळ योजनेनार्फत सरकारकडून पेन्शन दिली जाते, मात्र त्याची रक्कम अतिशय नाममात्र आहे. अपंग महिलांना घरातली कामं करताना इतर

महिलांपेक्षा जास्त शारिरिक श्रम पडतात, याचाही मूल्यांकन करताना विचार केला पाहिजे.

एकंदरीतच गृहिणींच्या घरकामाचं आर्थिक मूल्यांकन करण्याची वेळ तर आलीच आहे, पण घरकाम ही मुळातच केवळ स्त्रियांनी करण्याची गोष्ट नव्हे, ती कुणीही वा सगळ्यांनी करावी, हे ठसवण्याची आणि लिंगनिरपेक्ष घरकामाचा मोबदला देण्याची वेळ हीसुद्धा काळाची महत्वाची गरज आहे. या निबंधाच्या निमित्तानं यातील मुद्द्यांवर उलट- सुलट, आडवी- तिडवी चर्चा जरी सुरु झाली, तरी लिहिण्याचं इप्सित साध्य होईल.

..................समाप्त............................

प्रियांका तुपे

एच – १६, चौथा मजला,

एम्बीयन्स औरा सोसायटी,

कोल्हेवाडी, ऑफ सीडब्लूपीआरएस गेट क्रं - २

सिंहगड रोड, पुणे – ४११०२४

Email – tupriya2911@gmail.com

Phone – 9594037919